**नियमित दिवाणी दावा क्र.११/२०२४**

(दत्तात्रय नागणे वि. विजय नरसाळे)

**CNR No. MHSO07-000010-2024**

**<u>निशाणी क्र.३७ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द होऊन, त्यांनी नि.क्र.०५ ला दिलेले म्हणणे हिच त्यांची कैफियत आहे असे रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, नि.क्र.०५ ला म्हणणे दाखल करत असताना त्यांना महत्वाची कागदपत्रे मुदतीत न मिळाल्यामुळे त्यांनी कैफियत दाखल करणेस मुदत मागितली होती. सदर दाव्यातील मिळकतीसंबंधी फेरफार उपलब्ध न झाल्यामुळे नि.क्र.०५ ला दिलेले म्हणणे हीच प्रतिवादीची कैफियत असल्याबाबत पुरसिस देणे अनावधानाने राहून गेले. दिनांक ०२/०७/२०२५ राजी त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश पारित करण्यात आला. त्यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. याकामी त्यांचे देखील मौलिक हक्क हितसंबंध गुंतलेले आहेत. सबब, त्यांच्या विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होऊन मिळणेची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास रक्कम रुपये २०,०००/– खर्चाची आकारणी करण्याची विनंती केली.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, वादी व प्रतिवादी या दोघांचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीच्या विनंतीनुसार त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द न केल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये ३००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादीने खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत दयावी. |
| ३. | प्रतिवादीने वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करण्यात येत आहे. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.01.19 16:50:04 +0530

(पी. आर. पाटील)

दिनांकः- १९.०१.२०२६ ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 19.01.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 19.01.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 19.01.2026 |